महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
शुक्रवार, दिनांक २९ जुलै, २०१६
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : शोक प्रस्ताव -

श्री.सोमनाथ रामा वाणी, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

तीन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

महिला व बाल विकास मंत्री	:	महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा अडतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

पाच : औचित्याचे मुद्दे.

सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(१) **सर्वश्री संदीप नाईक,अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, पांडुरंग बरोरा, सुरेश लाड, किसन कथोरे, अमिन पटेल, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, मो.आरिफ नसीम खान, प्रा.वीरेंद्र जगताप, श्री हसन मुश्रीफ, श्रीमती मंदा म्हात्रे श्री.अबू आजमी, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नवी मुंबई येथील दिघा परिसरातील ९६ इमारती अनधिकृत ठरवून ती निष्कासित करण्याच्या माहे, सप्टेंबर, ऑक्टोबर २०१५ मध्ये दिघावासियांना देण्यात आलेली नोटिस, त्यामुळे सुमारे २५ ते ३० हजार रहिवाशांचे संसार उघड्यावर पडण्याची निर्माण झालेली भिती, हे सर्व नागरिक अत्यल्प उत्पन्न गटातील असून त्यांना संरक्षण मिळावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री यांना दिलेली लेखी निवेदने, दिघ्यातील जमिनी गुरचरण असल्याचे स्पष्ट करून त्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नावे असून दिघावासियांबाबत लवकरच मा. उच्च न्यायालयात धोरण सादर करण्याचे शासनाने दिलेले आश्वासन, सदर धोरणात उणीवा असल्याने मा. उच्च न्यायालयाने बांधकामावरील कारवाईस दोन-तीन वेळा दिलेली स्थगिती व आता बांधकाम निष्कासित करण्याचे दिलेले आदेश,

रहिवाशांनी मा. सर्वोच्च न्यायालयात दाद मागितल्याने सदर आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.३१ जुलै, २०१६ पर्यंत कारवाईस दिलेली स्थगिती, मुंबईतील उच्चभ्रू कँम्पाकोला इमारतीतील रहिवाशांना संरक्षण देण्याबाबत शासनाने बजावलेली ठाम भूमिका, याउलट दिघावासियांबाबत शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे संतप्त दिघावासियांनी अनेकवेळा केलेली निदर्शने, निष्काषणाच्या कारवाईस अवघे दहा ते बारा दिवस उरलेले असतांना दिघावासियांना न्याय देण्यासाठी कायद्याच्या चौकटीत बसणारे स्वयंस्पष्ट धोरण मा. सर्वोच्च न्यायालयास सादर करून त्यास ३१ जुलै, २०१६ पूर्वी मा. उच्च न्यायालयाची संमती घेण्याची आवश्यकता याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(२) **ॲड. राहुल कुल, सर्वश्री संग्राम थोपटे, बाबुराव पाचर्णे, महेश लांडगे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"खडकवासला प्रकल्पाचा मुळ उद्देश हा दौंड,हवेली व इंदापूर या तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी शाश्वत सिंचनाची व्यवस्था करण्यासाठी असणे, प्रत्यक्षात पुणे शहराची दिवसेंदिवस पिण्याच्या पाण्याची गरज वाढत असल्याने शेतीच्या पाण्यामध्ये करण्यात आलेली कपात, सन २०१५-१६ च्या हंगामामध्ये शेतीसाठी एकही आवर्तन न देणे, खडकवासला धरणसाखळीत ५० टक्केच्या आसपास पाणीसाठा झाला असतांनाही शेतीसाठी आवर्तन न मिळाल्याने निर्माण झालेला प्रश्न, या संकटावर मात करण्यासाठी पुणे शहराची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था बंद नळामधून करणे, कालव्याची दुरुस्ती, कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती, सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी वसुलीची रक्कम त्याच कालव्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी खर्च करण्याची होत असलेली मागणी, पुणे शहराची वितरण व्यवस्था सुधारुन प्रती व्यक्ती ३०० लिटर ऐवजी १५० लिटर मापदंड करण्याची आवश्यकता पुणे महानगरपालिकेने ६.५ टीएमसी पेक्षा जास्त वापरलेले पाणी शुध्दीकरण करुन म्हणजेच सांडपाण्यावर प्रक्रिया करुन मूळ प्रकल्पाच्या कालव्यात सोडण्याचे बंधन महापालिकेवर करणे,ज्या प्रमाणे खडकवासला, भामा आसखेड धरणातील शेतीसाठी असलेल्या पाण्यात कपात करुन पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले त्याचप्रमाणे मुळशी (टाटा) धरणाचे पाणी पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेऊन बेबी कालवा (जुना कालव्याचे) अस्तरीकरण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

(३) **सर्वश्री प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, विजय काळे, ॲड. आशिष शेलार, वि.स.स तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पनवेल, जि.रायगड येथील बस स्थानकाची झालेली दयनीय अवस्था, बस स्थानकाच्या ३६५१७ स्क्वेअर मिटरच्या परिसरा मधील दोन्ही जुन्या धोकादायक इमारत पाडण्यात आलेल्या असणे पनवेल स्थानकांत एकूण ४०१३ बस गाड्यांची थांबण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली असणे, प्रवाशांच्या गर्दीमुळे वाहतूक यंत्रणेवर ताण पडत असणे, अपुऱ्या यंत्रणेअभावी तीन प्रवाशांचे अपघातात मृत्यु झाले असून किरकोळ अपघाताच्या प्रमाणात वाढ होत असणे, प्रवाशांना उभे राहण्यासाठी एकमेव पत्र्याचे शेड अपूरे पडत असणे, गर्दीचा फायदा घेऊन पाकीटमारी, प्रवाशांच्या सामानाची चोरी व महिलांची छेडछाड या गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ होत असणे, आगाराच्या परिसरात पोलीस चौकी नसल्याने

पोलीसानांही गुन्हेगारांचा पकडण्यात येत असलेले अपयश, डेपोचा अस्वच्छ परिसर, अस्वच्छ शौचालय, त्यामधून येणारी दुर्गंधी, त्यामुळे प्रवाशांची होत असलेली गैरसोय, पनवेल एस.टी. आगाराचे मासिक उत्पन्न रु. २ कोटी पर्यंत असूनही बी.ओ.टी. तत्वावर डेपोच्या इमारतीचे बांधकाम अद्यापही सुरू झालेले नसणे, दोन वेळा मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये पारदर्शकता नसल्याचे कारण सांगून परिवहन विभागाकडून सदर कामास स्थगिती देण्यात येणे, पनवेल आगार नुतनीकरण करण्याबाबत वारंवार निवेदने देवूनही कोणतीच कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये व प्रवाशांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, पनवेल बस स्थानकामधील दूरवस्था पाहता प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी तातडीने बी. ओ. टी. तत्वावर सुसज्ज इमारत बांधण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

(४) **सर्वश्री संजय शिरसाट, सुभाष साबणे, डॉ जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री अनिल कदम, प्रदीप जाधव-नाईक, शांताराम मोरे, संदीपान भुमरे, नागेश पाटील-आष्टीकर, विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उर्जा मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"औरंगाबाद येथे महावितरण व जीटीएल कंपनी मध्ये झालेल्या करारानुसार शहरामध्ये ड्रम प्रोजेक्ट राबवितांना मोठया प्रमाणात झालेली अनियमितता, यामध्ये तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प), मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, यांनी संगनमताने सदरील करार संपुष्टात आणून किमान एक हजार कोटी रूपयांचा गैरव्यवहार केल्याचे उघडकीस येणे, या बाबत विविध समित्या स्थापन करुनही दडपण्यात आलेला चौकशी अहवाल, सुमारे ३०० कोटी रूपयाचा ताळमेळ न बसणे, जीटीएल या कंपनीने महावितरणला मालाचे हस्तांतरण करतेवेळी २२० कोटी रूपयांची सामग्री परत न करणे, कोटयवधी रूपयांच्या स्क्रॅप माल ई-निवीदा न करता परस्पर भंगारात विकणे, जीटीएलकडे कोटयवधी रुपयांची थकबाकी असतांना करार संपुष्टात आणणे, जीटीएलने एलबीटीव्दारे गोळा केलेली रक्कम महावितरणला जमा करणे आवश्यक असतांना ती जमा न करणे, भिवंडी, जळगाव येथील करोडो रूपयाचा स्क्रॅपचा माल औरंगाबाद येथील गोदामामध्ये ठेवल्याचे दाखविणे परंतू प्रत्यक्षात तेथे मालच नसल्याचे निदर्शनास येणे, या बाबत त्रयस्थ पक्षाद्वारे केलेल्या लेखा परिक्षण अहवालात मोठया प्रमाणात त्रुटी असून सदर अहवाल सोईनुसार बनवून गैरव्यवहार दडपण्याचा करण्यात आलेला प्रयत्न, या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन एसआयटी सारख्या विशेष एजन्सीमार्फत पुन्हा चौकशी करुन संबंधीतांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

सात : महाराष्ट्र विधानसभा नियम १४१(१) अन्वये मा. अध्यक्षांनी करावयाची घोषणा.

(गुरुवार, दिनांक २८ जुलै, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात

आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

आठ : **सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, डॉ.पंतगराव कदम, सर्वश्री शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, गणपतराव देशमुख, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री मकरंद पाटील, सुनिल केदार, गोपालदास अग्रवाल, डॉ.सतिश पाटील, सर्वश्री. मो.आरीफ नसीम खान, राणाजगजितसिंह पाटील, अमित देशमुख, दिलीप सोपल, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री बबनराव शिंदे, धनाजी अहिरे, राहुल मोटे, डी.पी.सावंत, हसन मुश्रीफ, मधुकरराव चव्हाण, शिवेंद्रसिह भोसले, कालिदास कोळंबकर, दत्तात्रय भरणे, बसवराज पाटील, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम जगताप, अमिन पटेल, राजेश टोपे, ॲड.के.सी.पाडवी, श्रीमती.दिपिका चव्हाण, सर्वश्री कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशिराम पावरा, अवधूत तटकरे, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती.अमिता चव्हाण, डॉ.संतोष टारफे, श्री.शेख आसिफ शेख रशिद,श्रीमती निर्मला गावित, श्री.अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री.संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु.प्रणिती शिंदे, सर्वश्री.सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :**

"राज्यात बेरोजगार तरूणांची वाढत असलेली संख्या, सेवायोजन केंद्रात नोकरी मिळण्यासाठी नोंदणी केलेल्या बेरोजगार तरुणांची संख्या ४० लाखांपर्यंत पोहचलेली असणे, परंतु त्यापैकी एक टक्का तरूणांनासुध्दा नोकरी न मिळणे, खाजगी संस्थांत व कंपन्यांत नोकरी मिळण्याच्या संधी असणे, परंतु या संस्था किंवा कंपन्या नोकर भरती करण्याची नोंद शासनाकडे करणे बंधनकारक असतांना ते त्यांच्या मर्जीप्रमाणे नियुक्त्या करीत असल्यामुळे सेवायोजन कार्यालयात नोंदणी केलेल्या तरुणांवर होत असलेला अन्याय, माहिती न देणाऱ्या अशा कंपन्या व संस्थांवर कारवाई करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आपल्या कार्यालयात कुली या पदासाठी ४ थी इयत्ता पास अशी शैक्षणिक पात्रता नमूद करुन जाहिरात दिली असता या पदासाठी २४२४ अर्ज प्राप्त होणे, त्यात पाच उमेदवार एमफील, नऊ पीजी डिप्लोमाधारक, १०९ डिप्लोमाधारक, २५३ पीजी डिग्रीधारक व ९८४ पदवीधारकांनी कुली या पदासाठी अर्ज करणे, कल्याण येथील एक तरुणीने बिझनेस मॅनेजमेंट स्टडीजमध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होवून देखिल नोकरी न मिळाल्यामुळे तिने राज्य पोलीस दलात पोलीस शिपाई पदासाठी अर्ज करणे, राज्यात एमबीए व्यवस्थापन अभ्यासक्रमांची मुंबई विद्यापीठाअंतर्गत ६६ महाविद्यालये व विना अनुदानित ३६१ महाविद्यालये असणे, एमबीएचे शिक्षण घेऊन सुध्दा तरूण-तरुणींना ८ ते १० हजार एवढया कमी वेतनावर नाईलाजाने काम करावे लागत असणे, बेरोजगार तरूणांच्या समस्येकडे वेळीच लक्ष न दिल्यास ते गुन्हेगारीकडे वळण्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, बेरोजगार तरूणांना किमान दोन हजार रूपये भत्ता देण्याची होत असलेली मागणी, राज्यातील नवीन उद्योगात कामगारांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना कायद्याच्या पळवाटा काढून कंपन्या कंत्राटी व अप्रेंटीस पध्दतीने कमी पगारावर नियुक्त्या करीत असणे, त्यामुळे कामगार व पदवीधारकांवर होत असलेला अन्याय, केंद्र शासनाने किमान वेतन कायदा मंजूर करून कमीत कमी १५ हजार वेतन देण्याचा निर्णय घेणे, त्याची अंमलबजावणी राज्यात करण्याची नितांत आवश्यकता, कामगार विभागात तसेच माथाडी कामगार बोर्डात अनेक पदे रिक्त असणे, राज्यात

कामगार कायद्यात करण्यात आलेला बदल, परंतु त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात येत नसल्यामुळे कामगारांना न्याय मिळत नसणे, कृषी निविष्ठांच्या दरात बेसुमार वाढ होऊन बियाणात झालेला काळा बाजार, त्यात कृषी उत्पादनाकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, थकीत अनुदानामुळे शेतकऱ्यांवर ओढवलेले अर्थिक संकट, राज्यात जीवनावश्यक वस्तुंचे तसेच भाजीपाला, फळ यांचे कडाडलेले दर, भाज्यांचे दर १०० रुपये किलो पेक्षा जास्त असणे, त्यामुळे सामान्य लोकांचे अर्थकारण कोलमडणे, त्याचप्रमाणे तूरडाळ १८६ रू, गहू ४० रू, तांदूळ ४७ रू, हरभरा डाळ ८५ रू,साखर ३८ रू., शेंगदाणा तेल १३४ रू., रिफाईंड तेल १३० रू. व वनस्पती तूप ७८ रू.किलो दराने मिळत असणे, महागाई रोखण्यासंदर्भात उपाय करण्यास शासन उदासीन असणे, चुकीची धोरणे व नियोजनाचा अभाव याचा नाहक फटका सर्वसामान्य नागरिकांना सोसावा लागत असणे, नुकतीच नागपूर मुंबई सुपर एक्सप्रेस हायवेची घोषणा करणे, त्याअंतर्गत घेण्यात येणारी जमीन ही लॅन्ड पुलिंगची योजना शेतक-यांना मान्य नसणे, या सर्व बाबींमुळे शेतक-यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

अशासकीय कामकाज
(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

नऊ : अशासकीय विधेयक :-

(अ) पुर:स्थापनार्थ :

(१) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३३ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ - **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३६ - कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१६ - **ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांचे.**

(ब) विचारार्थ :

(१) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ११ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ - **ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६६ - अल्पसंख्याक समाज (अत्याचारास प्रतिबंध) विधेयक, २०१५ - **श्री.अमिन पटेल, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) विधेयक, २०१६ - **श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. यांचे.**

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २८ जुलै, २०१६

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.